# जातीच्या दाखल्याची जातपडताळणी करून घेणे गरजेचे: तालुका समन्वयक सचिन कांबळे




विविध शिष्यवृत्ती योजना या विषयावर मार्गदर्शन करताना सचिन कांबळे समवेत डॉ. एस. एस .कुरलीकर, डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. बी. एन. रावण, प्रा. पी. डी. माने, प्रा. डी. एच. नाईक

का ॅलेजमध्ये असताना आपल्या जातीच्या दाखल्याची जातपडताळणी करून घेणे गरजेचे आहे. जातपडताळणी करण्यासाठी समाजकल्याण विभागामार्फत आ ॅनलाईन फा ॅर्म भरण्याची व्यवस्था केलेली आहे त्यासाठी आवश्यक कागदपत्रे जोडली तर अल्पखर्चामध्ये आपल्या दाखल्याची जातपडताळणी होऊ शकते या आ ॅनलाईन प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली फसवणूक होणार नाही असे प्रतिपादन समाज कल्याण विभागातील तालुका समन्वयक सचिन कांबळे यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिष्यवृत्ती समिती,समान संधी केंद्र समिती व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग ,कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विविध शिष्यवृत्ती योजना व आवश्यक कागदपत्रे या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सचिन कांबळे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील म्हणाले महाराष्ट्र शासनामार्फत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अनेक प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात सर्व जातीसाठी वेगवेगळया शिष्यवृत्ती आहेत त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन. रावण ,सहसमन्वयक डॉ.एस.एस.कुरलीकर,ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ.उषा पवार होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत शिष्यवृत्ती समिती प्रमुख प्रा.पी.डी.माने यांनी केले आभार डॉ.भारती शिंदे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.डी.एच.नाईक यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.